# ‘अप्रगत’ शाळेच्या शिक्षकांची वेतनवाढ रोखणार!

## पालिकेच्या पर्यवेक्षीय धोरणामधील अट

प्रतिनिधी, मुंबई

**बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत** येणाऱ्या माध्यमिक शाळांच्या प्रत्येक विषयाच्या निकालाच्या टक्केवारीनुसार आता संबंधित विषयाच्या शिक्षकांची वेतनवाढ रोखण्यात येणार असून दंडही ठोठावला जाणार आहे. तसेच प्राथमिक शाळांचेही मूल्यमापन प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमामध्ये नमूद करण्यात आलेल्या २५ निकषांद्वारे केले जाणार असून त्यानुसार त्यांचीही वेतनवाढ रोखली जाणार आहे. त्यामुळे आता शासनाच्या व्याख्येनुसार ‘अप्रगत’ असणाऱ्या शाळेच्या शिक्षकांची वेतनवाढ रोखण्यात येणार असून त्यांना दंडही भरावा लागणार आहे. पालिकेने जाहीर केलेल्या पर्यवेक्षणीय धोरणामधील या शास्तीच्या अटीविरोधात शिक्षकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. परंतु विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये कामचुकारपणा करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करणे योग्यच असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

पालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व खासगी प्राथमिक (अनुदानित किंवा विनाअनुदानित) शाळांच्या कामाकाजाचे पर्यवेक्षीय धोरण पालिकेने निश्चित केले आहे. यामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या २५ निकषांनुसार शाळांचे मूल्यमापन केले जाणार असून त्यांना ‘अ’ ते ‘ड’ श्रेणी देण्यात येणार आहे. संकलित मूल्यमापन परीक्षा दोन उत्तीर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची ‘अ’ श्रेणीमध्ये गणना करण्यात येईल. तसेच नववी व दहावीतील प्रत्येक विद्यार्थी निकषांनुसार प्रत्येक विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक असेल, असे परिपत्रकच पालिकेने जाहीर केले आहे

या नव्या धोरणानुसार शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या पर्यवेक्षणामध्ये २५ पेक्षा कमी निकष पूर्ण केले असतील व संकलित मूल्यमापन २ नंतर ‘अ’पेक्षा कमी दर्जाची वर्ग श्रेणी प्राप्त केली असल्यास संबंधित शिक्षकाची वेतनवाढ रोखण्यात येणार असून नियमानुसार दंडही ठोठावण्यात येणार आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या शिक्षकांची निकषांच्या पूर्ततेच्या संख्येनुसार व संकलन मूल्यमापन वर्ग श्रेणीनुसार ही वेतनवाढ रोखण्यात येणार आहे, असे परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे. माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना नववी व दहावीला शिकवीत असणाऱ्या प्रत्येक विषयाचा निकाल ९० टक्केपेक्षा कमी असेल तर दंड आणि वेतनवाढ रोखण्याची शास्ती लागू करण्यात येणार आहे. यामध्ये विषयाच्या निकालाच्या टक्केवारीनुसार दंडाची रक्कम आणि वेतनवाढ रोखण्याची नियमावली परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आली आहे.

गुणवत्ता सुधारण्यासाठी हे पर्यवेक्षीय धोरण पालिका आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये शिक्षकांवर शास्ती लागू करण्यापूर्वी त्यांना सुधारणा करण्यासाठी तीन वेळा मुदत देण्यात येणार आहे. यासोबत योग्य कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना गुणांकनानुसार प्रोत्साहनपर पुरस्कार, प्रशस्तीपत्रकही देण्यात येणार आहे, असे शिक्षणाधिकारी महेश पालकर यांनी सांगितले आहे.

> **गुणवत्ता वाढ होणे गरजेचे आहे. म्हणून त्यासाठी केवळ शिक्षकाला जबाबदार धरणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी इतर काही घटकही जबाबदार आहेत. शिक्षकांच्या मागे अनेक कामे लावण्यात आली आहेत. अशा परिस्थितीमध्ये शिक्षकाला जबाबदार धरून वेतनवाढ रोखणे, योग्य नाही.**
>
> – प्रशांत रेडीज, सचिव, मुंबई मुख्याध्यापक संघटना

> **वर्गात मागे पडणारी मुले ओळखण्यासाठी नैदानिक चाचण्या, पायाभूत चाचण्या आणण्यात आल्या. परंतु या मागे पडणाऱ्या मुलांना वर्गासोबत आणण्याची जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारलीच नाही. मग आता होणाऱ्या मूल्यमापनानुसार त्याची किंमत जर शिक्षकांना मोजावी लागत असेल तर ते त्यांच्या कामाचे फळ आहे.**
>
> – बसंती रॉय, माजी शिक्षण निरीक्षक

## लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वेळेतही आजपासून बदल

**मुंबई :** उपनगरीय गाड्यांच्या वेळापत्रकात १ नोव्हेंबरपासून बदल करण्यात आला असतानाच आता लांब पल्ल्यांच्या गाडयांच्या वेळेतही बदल करण्यात आला आहे. त्यानुसार मध्य रेल्वे मार्गावरून सुटणाऱ्या ९ लांब पल्ल्याच्या गाड्या या पाच मिनिट ते पंधरा मिनिटे आधीच सुटतील. सीएसएमटीहून सुटणाऱ्या ९ लांब पल्ल्यांच्या गाड्यांपैकी अमरावती एक्स्प्रेस रात्री ८.०५ च्या ऐवजी ७.५५ वाजता सुटेल. तर मनमाड राज्यराणी एक्स्प्रेस सायंकाळी ६.५० च्या ऐवजी पाच मिनिटे आधी, कोल्हापूर एक्स्प्रेस रात्री ८.२३ ऐवजी ८.२० वाजता, पुण्यातून डेक्कन एक्सप्रेस दुपारी ३.३० ऐवजी ३.१५ वाजता सुटेल. याची अंमलबजावणी १ नोव्हेंबरपासून होणार आहे.

## ‘अखेर जमलं’पासून अभिनयाशीच त्यांचं जमलं

### शरद तळवलकर जन्मशताब्दीस आजपासून प्रारंभ

विद्याधर कुलकर्णी, पुणे



**ज्यांच्या नावात** काना, मात्रा, वेलांटी, उकार, रफार नाही असे साधे आणि सरळ परंतु दिलखुलास व्यक्तिमत्त्व अशा शब्दांत महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांनी ज्यांचा गौरव केला ते नटश्रेष्ठ शरद तळवलकर यांचे जन्मशताब्दी वर्ष उद्यापासून (१ नोव्हेंबर) सुरू होत आहे. रंगभूमीवरील नाटके आणि चित्रपटांतून खळखळून हसविणारे आणि त्याचवेळी गंभीर भूमिकांनी प्रेक्षकांना हेलावून सोडणाऱ्या तळवलकर यांची सहा दशकांची प्रदीर्घ कारकीर्द ही त्यांच्या अजरामर भूमिकांतूनच उरली आहे.

बोधेगाव (जि. नगर) येथे १ नोव्हेंबर १९१८ रोजी जन्म झालेले शरद तळवलकर शालेय शिक्षणासाठी पुण्यामध्ये आले तेव्हा हा मुलगा थोर कलाकार होईल, असे कोणी भाकित केले असते तरी विश्वास बसला नसता. पेरुगेट येथील भावे स्कूलमध्ये शिकत असताना स्नेहसंमेलनातील सहभाग आणि नंतर महाविद्यालयीन दशेत नाटकांचे दिग्दर्शन एवढ्यापुरतीच त्यांची आवड होती. नटवर्य केशवराव दाते यांनी शरद यांच्यातील नाट्यगुण हेरले आणि १९३८ मध्ये त्यांना नाट्य विकास कंपनीमध्ये बोलावून घेतले. मग तळवलकर यांनी मागे वळून पाहिलेच नाही. पन्नासच्या दशकानंतर दत्ता धर्माधिकारी यांच्या ‘अखेर जमलं’ या चित्रपटाद्वारे शरद तळवलकर आणि राजा गोसावी या दोन कलाकारांनी रूपेरी पडद्यावर पदार्पण केले. तेव्हापासून निखळ विनोदासाठी लोकप्रिय असलेल्या या दोघांची जोडी जमली. ‘अवघाची संसार’ हा त्यांचा पहिला रंगीत चित्रपट होता. विनोदी अभिनेता ही त्यांची प्रतिमा ‘रंगल्या रात्री अशा’ चित्रपटातील दादूमियाँ भूमिकेने बदलली. या भूमिकेची तयारी म्हणून बालगंधर्व यांना सारंगीवादनाची साथ करणारे उस्ताद कादरबक्श यांच्याकडून त्यांनी सारंगीवादनाचे शिक्षण घेतले होते. ‘एकच प्याला’ आणि ‘लग्नाची बेडी’ या नाटकांसह ‘आप्पाजींची सेक्रेटरी’ आणि ‘घरोघरी हीच बोंब’ ही त्यांची नाटके गाजली होती.

**FULLERTON INDIA CREDIT COMPANY LIMITED**

Fullerton India

Registered office address: Megh Towers, 3rd Floor, Old No. 307, New No.165, Poonamallee High Road, Maduravoyal, Chennai - 600 095 Tamil Nadu
Toll free no. 1800 103 6001 | Email : namaste@fullertonindia.com
Website : www.fullertonindia.com | CIN number : U65191TN1994PLC079235

**Statement of Standalone Financial Results for the Half Year Ended 30 September 2017** (₹ in Lakhs)

| Particulars | Half year ended 30 Sept 2017 | Half year ended 30 Sept 2016 | Year Ended 31 Mar 2017 |
|---|---|---|---|
| | Unaudited | Unaudited | Audited |
| 1. Total Income from Operations | 1,24,764 | 1,30,770 | 2,64,257 |
| 2. Net Profit / (Loss) for the year (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 10,666 | 25,348 | 33,121 |
| 3. Net Profit / (Loss) for the year before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 10,666 | 25,348 | 33,121 |
| 4. Net Profit / (Loss) for the year after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 6,828 | 16,440 | 21,429 |
| 5. Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 6,828 | 16,440 | 21,429 |
| 6. Paid-up Equity Share Capital | 1,98,007 | 1,92,116 | 1,98,007 |
| 7. Reserves (excluding Revaluation Reserves) | 58,779 | 35,818 | 52,395 |
| 8. Net Worth | 2,44,227 | 2,13,876 | 2,39,259 |
| 9. Outstanding Debt | 10,49,450 | 10,83,795 | 10,97,512 |
| 10. Debt Equity Ratio (x) | 4.1x | 4.8x | 4.4x |
| 11. Earnings Per Share (EPS) (of Rs. 10/- each) (in Rupees) | | | |
| - Basic EPS | 0.34 | 0.86 | 1.12 |
| - Diluted EPS | 0.34 | 0.86 | 1.12 |

1. The above financial results for the half year ended 30 September 2017, have been taken on record by the Board of Directors on 30 October 2017, in accordance with the requirement of Regulation 52 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.
2. The results for the half year ended 30 September 2017 have been subjected to limited reveiw by the Statutory auditors of the Company.
3. During the half year ended 31 March 2017, the Company had changed the policy on recognition of borrowing expenses incurred in connection with the issuance of debentures, from amortisation over the tenure of debentures issued to adjusting the same against securities premium account. Had the Company applied the policy followed till 30 September 2016, the profit before tax for the half year ended 30 September 2017 would have been lower by Rs. 357 lakhs.
4. The Company operates in a single business segment i.e. financing, which has similar risks and returns for the purpose of AS - 17 on ‘Segment Reporting’ specified under section 133 of the Companies Act, 2013, read with rule 7 of the Companies (Accounts) Rules, 2014 and Companies Amendment Rules, 2016. The Company operates in a single geographic segment, i.e. domestic.
5. During previous year ended 31 March 2017, the Company had performed a qualitative assessment of its loan portfolio and made additional judgmental provision of INR 16,327 lakhs to address potential impact from demonetisation. The Company has now reassessed the loan portfolio and is of the view that this provision is no longer required. Accordingly above stated provision of INR 16,327 lakhs has been released during half year ended 30 September 2017. The Company also revised its provisioning on standard asset to bring it line with extant RBI regulations. Had the Company applied the provisioning followed till 31 March 2017, profit before tax would have been lower by INR 3,580 lakhs.
6. Reserves include Statutory Reserve as per Section 45IC of Reserve Bank of India Act, 1934, balance in securities premium account and retained earning.
7. The above is an extract of the detailed format of half yearly financial results filed with the National Stock Exchange under Regulation 52 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the half yearly financial results are available on the website of the stock exchange i.e. www.nseindia.com and the Company www.fullertonindia.com.
8. For the items referred in sub-clauses (a), (b), (d) and (e) of the Regulation 52 (4) of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015, the pertinent disclosures have been made to the National Stock Exchange and can be accessed on its website www.nseindia.com
9. The figures for the previous period/year have been regrouped/ rearranged wherever necessary to conform to current period/year presentation.

For and on behalf of the Board of Directors of Fullerton India Credit Company Limited

Sd/-
Shantanu Mitra
CEO & Managing Director

Date : 30 October 2017

TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांकरिता अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

रु. कोटीत

| तपशील | ३०.०९.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१६ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१७ रोजी संपलेले सहा महीने | ३०.०९.२०१६ रोजी संपलेले सहा महीने | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | १४,२२०.९३ | १४,४२१.७२ | ११,७१८.३१ | २८,६४२.६५ | २२,०४१.७९ | ५३,२६०.९६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्व) | २,००३.१५ | १,४११.८७ | ४३१.०५ | ३,४१५.०२ | १,५२५.७५ | ६,०६०.३१ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,९७६.५० | ७९५.०८ | ३६६.७६ | २,७७१.५८ | १,३०५.९९ | ५,३५६.९३ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १,२९४.०८ | ५०६.४५ | २४९.५६ | १,८००.५३ | ८२४.९९ | ३,४४४.५५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [ कालावधीसाठी (करोत्तर) नफा/(तोटा) व इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) समाविष्ट असलेले ] | १,२१३.१४ | ३७७.३० | ८२१.७५ | १,५९०.४४ | २,०३५.३६ | ४,१२०.३४ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १० प्रति समभाग) | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ |
| पुनर्मूल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | ४८,६८७.६० |
| नेट वर्थ | | | | ५२,२७७.५७ | ४९,९३५.७८ | ५१,९३४.०१ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १०,२६०.७१ | ९,५१७.३६ | १०,१७५.७० |
| निव्वळ कर्ज इकिटी गुणोत्तर | | | | ०.४२ | ०.५३ | ०.४४ |
| प्रत्येकी रु. १० च्या मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबीनंतर) | १२.८७ | ४.७७ | २.१२ | १७.६४ | ७.६० | ३३.६७ |
| प्रत्येकी रु. १० च्या सौम्यीकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबीनंतर) | १२.८७ | ४.७७ | २.१२ | १७.६४ | ७.६० | ३३.६७ |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| कर्ज सेवा व्याप्ती गुणोत्तर | | | | ४.२५ | २.०३ | २.७२ |
| व्याज सेवा व्याप्ती गुणोत्तर | | | | ५.१५ | २.८१ | ४.२१ |

**३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांकरिता एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

रु. कोटीत

| तपशील | ३०.०९.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१६ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१७ रोजी संपलेले सहा महीने | ३०.०९.२०१६ रोजी संपलेले सहा महीने | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ३२,४६४.१४ | ३०,९७३.३३ | २७,११९.६५ | ६३,४३७.४७ | ५३,०९०.३६ | ११७,४१९.९४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्व) | २,१७०.४७ | २,२९०.५४ | ३५२.९५ | ४,४६१.०१ | १,४७०.४५ | ६,७९७.८६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | २,१२५.८२ | १,६७३.७५ | २९३.६६ | ३,७९९.५७ | १,२४३.३६ | २,४७३.६३ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ९८७.८५ | ९३३.२२ | (६९.७१) | १,९२१.०७ | १३९.७२ | (३०४.३८) |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | २९.९३ | (१२.१३) | २०.३३ | १७.८० | (३,३७२.१७) | (३,८६४.१९) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [ कालावधीसाठी (करोत्तर) नफा/(तोटा) व इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) समाविष्ट असलेले ] | (३,२१६.६९) | (२,६२०.७१) | (२,६५१.५०) | (५,८३७.४०) | (५,४८०.३८) | (४,७३१.६३) |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १० प्रति भाग) | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ |
| राखीव (पूनर्मूल्यांकीत राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | | | ३६,१७५.७८ |
| नेट वर्थ | | | | ३२,०२८.५१ | ३८,१६८.९१ | ३९,४२१.०२ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासकरिता) | | | | | | |
| प्रत्येकी रु. १० च्या मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबींनंतर) | ९.७३ | ९.१७ | (१.१७) | १८.९० | ०.५४ | (४.९३) |
| प्रत्येकी रु. १० च्या सौम्यीकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबीनंतर) | ९.७३ | ९.१७ | (१.१७) | १८.९० | ०.५४ | (४.९३) |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनाकरिता) | | | | | | |
| प्रत्येकी रु. १० च्या मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबीनंतर) | १०.०४ | ९.०४ | (०.९६) | १९.०८ | (३४.२२) | (४४.७७) |
| प्रत्येकी रु. १० च्या सौम्यीकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत-(अपवादात्मक बाबीनंतर) | १०.०४ | ९.०४ | (०.९६) | १९.०८ | (३४.२२) | (४४.७७) |

**टीप :**

ए) वरील माहिती म्हणजे सेबी (लिस्टिंग अँन्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिनंसाठीच्या अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठीच्या अलिप्त आणि एकत्रिकृत निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट्स (www.nseindia.com/www.bseindia.com) व कंपनी वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) सेबी (लिस्टिंग अँन्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन्स ५२(४) च्या पोट-खंड (ए), (बी), (डी), व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी समायोचित माहिती एनएसई व बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) कडे जाहीर केली असून युआरएल (www.tatasteel.com) येथे पाहता येईल.

सी) १ जुलै, २०१७ पासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यानंतर प्रवर्तनामधून उत्पन्नाची माहिती जीएसटीच्या निव्वळ जाहीर केली आहे. त्यानुसार ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठीचे प्रवर्तनातून उत्पन्न, निष्कर्षात सादर केलेल्या मागील कालावधीची तुलनायोग्य नाही.

टी.व्ही. नरेंद्रन
मॅनेजिंग डायरेक्टर

कौशिक चॅटर्जी
ग्रुप एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर

मुंबई : ३० ऑक्टोबर, २०१७

TATA STEEL

**राष्ट्रीय पात्रता नि प्रवेश परीक्षा**
**एनईईटी- एमडीएस २०१८**
**राष्ट्रीय परीक्षा मंडळ**

**(एमडीएस २०१८ शैक्षणिक सत्राकरिता प्रवेशाबाबत)**

- ***एनईईटी-एमडीएस २०१८*** सर्व डेंटल पीजी कोर्सेस- २०१८ शैक्षणिक सत्राकरिता एकेरी खिडकी प्रवेश परीक्षा आहे. अन्य कोणतीही प्रवेश परीक्षा, राज्य किंवा संस्था पातळीवरील, एमडीएस कोर्सेसच्या प्रवेशाकरिता वैध असणार नाही.
- राष्ट्रीय परीक्षा मंडळ सर्व परीक्षा केंद्राकडे एकेरी सत्रात **०७ जानेवारी, २०१८** रोजी कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) म्हणून ***एनईईटी-एमडीएस***चे आयोजन करणार आहे.

**एनईईटी-एमडीएस २०१८ करिता पात्रता कसोट्या**

- डेंटल सर्जरी कोर्समधील मास्टरकरिता प्रवेशासाठी उमेदवाराजवळ भारतातील विद्यापीठ किंवा संस्थाद्वारा प्रदान केलेल्या डेंटल सर्जरीमधील बॅचेलरची मान्यताप्राप्त डिग्री असावी आणि तो स्टेट डेंटल काऊन्सिलकडे नोंदणीकृत असावा आणि त्याने मान्यताप्राप्त डेंटल कॉलेजात एक वर्षाची अनिवार्य आळीपाळीने इंटर्नशिप पूर्ण केलेली असावी. **एनईईटी-एमडीएस २०१८** मध्ये बसण्याकरिता पात्रता निश्चित करण्यासाठी इंटर्नशिपच्या पूर्ततेकरिता कट-ऑफ तारीख **३१ मार्च, २०१८** असेल.

***एनईईटी-एमडीएस २०१८* करिता अर्ज करणे**

- उमेदवार **३१ ऑक्टोबर, २०१७ पासून ते २७ नोव्हेंबर, २०१७** पर्यंत ***एनईईटी-एमडीएस***करिता ऑनलाइन पोर्टलद्वारा नोंदणी करू शकतील. उमेदवार ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम पसंती’ या तत्त्वावर ऑनलाइन नोंदणी प्रणालीद्वारा परीक्षा शहराची निवड करू शकतील.

**परीक्षा शुल्क**

जनरल /ओबीसी उमेदवार ₹ ३७५०/-
एससी/एसटी/पीडब्ल्यूडी/ (पीएच) उमेदवार ₹ २७५०/-

- परीक्षेकरिता शुल्क नेट बँकिंगद्वारा किंवा भारतातील बँकांद्वारा निर्गमित केलेल्या क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्डचा वापर करून, अर्ज प्रपत्रांच्या ऑनलाइन सादरीकरणाच्या वेळी गेट-वे प्रदानाद्वारा भरावयाचे आहे.

**महत्त्वाच्या तारखा**

| | |
|---|---|
| i. अर्ज प्रपत्रांचे ऑनलाइन सादरीकरण | ३१ ऑक्टोबर, २०१७ पासून ते २७ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत |
| ii. परीक्षेची तारीख | ०७ जानेवारी, २०१८ |
| iii. निकालाच्या घोषणेची तारीख | ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत |

- अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी ***एनईईटी-एमडीएस २०१८*** इन्फर्मेशन बुलेटिन काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. इन्फर्मेशन बुलेटिन **www.nbe.edu.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- उमेदवारांना कळविण्यात येते की, कोणत्याही गैरप्रकाराबाबत गंभीररीत्या तपासणी करण्यात येईल आणि तसे आढळून आल्यास सदर उमेदवारावर कठोर कारवाई करून त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

**कॅण्डिडेट केअर हेल्पलाइन नंबर : १८०० १११ ७००/१८०० १११ ८०० (टोल फ्री)**
**(सोमवार ते शनिवार - स. ०९.३० वा.पासून ते सायं. ०५.३० वा.पर्यंत**

**एनबीई परीक्षा केंद्रांमध्ये मोबाइल फोन्स/ इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. मोबाइल फोन्स/ इलेक्ट्रॉनिक वस्तू जवळ ठेवणे/ वापर करणे उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल. कृपया इन्फर्मेशन बुलेटिन काळजीपूर्वक वाचावे.**